● सोमवार, दि. ३० डिसेंबर २०२४ ● जालना ● वर्ष ६ वे ● अंक १५२ वा ● किमंत २ रुपये ● पाने ४

8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

### वॉटरग्रीडमध्ये खोटी माहिती देत शासनाची दिशाभूल

# अधीकाऱ्यांचे निलंबन तर कंत्राटदाराला काळ्या यादीत टाकून अजामीनपात्र फौजदारी स्वरूपाचे गुन्हे दाखल करा; आ. बबनराव लोणीकर आक्रमक

### गावात पाणी पोहोचले नसताना कंत्राटदार व अधिकाऱ्यांनी केवळ कागदावर हायड्रोलिक टेस्ट करून २६ कोटीचे बिल लाटल्याचा आरोप

**छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी** - परतुर विधानसभा मतदारसंघातील १७६ गाव वॉटर ग्रीड व ९५ गाव वॉटर ग्रीड भौतिकदृष्ट्या व आर्थिकदृष्ट्या पूर्ण झाली असल्याचा खोटा अहवाल केंद्र व राज्य सरकारला सादर करत शासनाची दिशाभूल करणाऱ्या अधिकाऱ्यांना आपण कदापि माफ करणार नसून त्यांनी ५ लाख लोकांच्या तोंडचे पाणी पळवले आहे ७ डिसेंबर २०२३ रोजी १७६ गाव वॉटर ग्रीड व २७ डिसेंबर २०२३ रोजी ९५ वॉटर ग्रिडचे बिल खोटी कागदपत्रे दाखल करून अधिकाऱ्यांशी आर्थिक व्यवहार करत कंत्राटदार व अधिकाऱ्यांच्या संगतमताने उचलण्यात आले. त्यामुळे त्यांना तुरुंगाची वारी करावी लागणारच असा स्पष्ट इशारा माजीमंत्री आमदार श्री बबनराव लोणीकर यांनी आज आढाव बैठकीदरम्यान दिला.

छत्रपती संभाजीनगर येथे महाराष्ट्र जीवन प्राधिकार्यांच्या मुख्य अभियंता कार्यालयात माजी मंत्री आमदार श्री बबनराव लोणीकर यांच्या अध्यक्षतेखाली १७६ गाव, ९५ गाव वॉटर ग्रीड व १२० गाव पाणीपुरवठा योजना कामाची आढावा बैठक पार पडली या बैठकीला मुख्य अभियंता मनीषा पलांडे, सदस्य सचिव कार्यालयाचे अधीक्षक अभियंता श्री अजयसिंग, अधीक्षक अभियंता श्री कोळी कार्यकारी अभियंता श्री चव्हाण कंत्राटदार श्री घुले, उप अभियंता श्री लांडगे उप अभियंता श्री गायकवाड उप अभियंता श्री गाझी यांच्यासह गटविकास अधिकारी परतुर श्री तांगडे गटविकास अधिकारी मंठा श्री गगनबोने, गटविकास अधिकारी जालना यांच्यासह अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

या बैठकीदरम्यान आमदार लोणीकर बोलत होते पुढे बोलताना श्री लोणीकर म्हणाले की १७६ गाव वॉटर ग्रीड व ९५ वॉटर ग्रीड या अत्यंत महत्त्वकांक्षी योजना असून परतुर विधानसभा मतदारसंघातील ५ लाख लोकांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न या वॉटर ग्रीड मुळे संपुष्टात येणार आहे असे असताना महाराष्ट्र जीवन प्राधिकरण चे मुख्य अभियंता, अधीक्षक अभियंता, कार्यकारी अभियंता, उपअभियंता, शाखा अभियंता यांनी संबंधित कंत्राटदराशी संगणमत करून आर्थिक गैरव्यवहार करत ही योजना पूर्ण झाली असल्याचा अहवाल शासनाकडे सादर केला आहे ही पूर्णपणे शासनाची फसवणूक असून गावात पाणी पोहोचले नसेल तर योजना पूर्ण कशी काय होऊ शकते? असा सवाल देखील यावेळी आमदार लोणीकर यांनी उपस्थित केला.

परतुर तालुक्यातील मापेगाव येथील उद्धव विहिरीवरून जलशुद्धीकरण केंद्रापर्यंत जलशुद्धीकरण केंद्र पर्यंत एकच हायड्रोलिक टेस्ट करण्यात आली. जलशुद्धीकरण केंद्रापासून जलकुंभापर्यंत आणि जलकुंभा पासून पाण्याच्या टाकीपर्यंत जर हायड्रोलिक टेस्ट करण्यात आलीच नाही तसेच जलकुंबा पासून गावातील पाण्याचा पाणी पर्यंत १७६ गाव ९५ गाव या दोन्ही वॉटर ग्रीड मध्ये कुठलीही हायड्रोलिक टेस्ट करण्यात आलेली नाही. गावागावातील पाण्याच्या टाक्याचे बांधकाम पूर्ण झालेले नाही, असे असताना शासनाकडे खोटा अहवाल सादर करण्याच्या तारखेपर्यंत एकाही गावांमध्ये पिण्याचे पाणी मिळालेले नव्हते असे आसताना योजना भौतिक दृष्ट्या व आर्थिक दृष्ट्या पूर्ण कशी होऊ शकते? असा सवाल देखील आमदार लोणीकर यांनी यावेळी उपस्थित केला.

दि. ७ डिसेंबर २०२३ रोजी १७६ गाव वॉटर ग्रीडचे अंतिम देयक (१३ कोटी २२ लाख ४७ हजार 0३२ रुपये) अदा करण्यात आले त्यावेळी ५२ गावात पाणी पोहोचलेलेच नव्हते ते आजही आजच्या तारखेत पोहोचलेले नाही. तसेच दि. २७ डिसेंबर २०२३ रोजी ९५ गाव वॉटर ग्रीड चे अंतिम देयक (१३ कोटी १८ लाख ७0 हजर २४१ रु ) अदा करण्यात आले, त्या तारखेपर्यंत एकही गावात पाणी पोहोचलेले नव्हते. असे असताना अधिकाऱ्यांनी मात्र संबंधित कंत्राटदाराशी संगणमत करून आर्थिक व्यवहार करत सर्व गावांमध्ये पाणी पोहोचले असल्याचा खोटा अहवाल सादर केला आहे. १७६ गाव व ९५ गाव वॉटर ग्रीड चे काम पूर्ण होत नाही तोपर्यंत १२० गाव पाणीपुरवठा योजनेची कुठलीही देयके देण्यात येऊ नयेत. असेही लोणीकर यावेळी म्हणाले.



पुढे बोलताना लोणीकर म्हणाले की १७६ गाव वॉटर ग्रीड व ९५ गाव वॉटर ग्रील या दोन्ही योजना पूर्ण झाल्यानंतर संबंधित कंत्राटदाराने तीन वर्षे ही योजना चालवायची आहे त्यानंतर या योजनेचे पूर्ण बिल अदा करणे बाबत शासनाचे निर्देश असताना अधिकाऱ्यांनी आर्थिक गैरव्यवहार करत भ्रष्टाचार करून संबंधित कंत्रालदाराला पूर्ण बिल दिलेले आहे ही बाब अत्यंत गंभीर आणि कुठल्याही परिस्थितीत माफ करणे योग्य नाही त्यामुळे शासनाला खोटी माहिती देणाऱ्या कंत्राटदाराशी संगणमत करून आर्थिक गैरव्यवहार करणाऱ्या आणि लाखो लोकांच्या तोंडचे पाणी पळवणाऱ्या भ्रष्ट अधिकाऱ्यांना तुरुंगाची वारी करावी लागणार तसेच संबंधित कंत्राटदराला काळ्या यादीत टाकून शासनासह सर्वसामान्य जनतेची फसवणूक करणाऱ्या कंत्राटदार व मुख्य अभियंता अधीक्षक अभियंता कार्यकारी अभियंता उपअभियंता शाखा अभियंता यांच्यावर अजामीन पात्र गुन्हे दाखल करत तात्काळ निलंबित करण्यासंदर्भात मुख्य सचिव, प्रधान सचिव, सदस्य सचिव यांच्याकडे आपण मागणी करणार असल्याचे देखील आमदार बबनराव लोणीकर यांनी यावेळी सांगितले.

गावागावामध्ये पाणी पोहोचले असल्याची खोटी माहिती कंत्राटदाराच्या वतीने मुख्य अभियंता कार्यालयात देण्यात आली व त्या आधारे संपूर्ण बिल देण्यात आले. ग्रामपंचायत अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनंतर आपण दिलेली माहिती खोटी असल्याचे बैठकीदरम्यान अधिकाऱ्यांच्या समोर सिद्ध झाले. ग्रामपंचायत अधिकाऱ्यांनी गावात पाणी पोहोचले आहे किंवा नाही या सदर्भातला लेखी अहवाल गटविकास अधिकाऱ्यांमार्फत मुख्य अभियंता यांच्याकडे दिला आहे. प्रसंगी आमदार बबनराव लोणीकरांनी या शासनाला खोटी माहिती देणाऱ्या भ्रष्ट अधिकाऱ्यांची चांगलीच खरडपट्टी काढली. शासनाचा पैशाचा अपव्यय करणाऱ्या आणि लाखो लोकांच्या तोंडचे पाणी पळवणाऱ्या अधिकाऱ्यांना तात्काळ निलंबित करत जामीनपात्र फौजदारी स्वरूपाचे गुन्हे दाखल करण्यासंदर्भात कारवाई करणार असल्याचे देखील लोणीकर यांनी स्पष्ट केले.






संपादकीय पान

# नववर्षाचे स्वागत करा,जरा जपुन!

इंग्रजी नवीन वर्ष आनंदाचा क्षण जरी असला तरी आपापल्या संस्कृतीच्या माध्यमातून नवीन वर्ष साजरे केले पाहिजे. कारण भारतात अनेक धर्म,अनेक पंथ, अनेक भाषा अशा विभिन्नतेतून अखंड भारताची निर्मिती झाली आहे. त्यामुळे पाश्चिमात्य देश कोणत्या पध्दतीने नवीन वर्ष साजरे करतात याकडे लक्ष न देता आपल्या संस्कृतीच्या व धर्माच्या आधारावर नवीन वर्षाचा कार्यक्रम साजरा करून नववर्षाचे स्वागत करावे.नववर्षाच्या निमित्ताने धर्म, संस्कृती, मानसन्मान,आदरतिथ्य यांच्या संगमातून नवीन वर्षाचे स्वागत करून जुन्या वर्षाला निरोप देऊन नवीन वर्ष सुख समृद्धीचे जावो अशी सर्वांनीच ईश्वरचरणी प्रार्थना करावी.कारण फक्त हुल्लडबाजी करून नवीन वर्ष साजरे होत नसुन कौटुंबिकतेच्या माध्यमातून साजरे केले तर याचा आनंद आगळावेगळा दिसून येईल व संपूर्ण कुटुंबात या दिवसाला एक आगळावेगळे स्वरूप येईल.काही युवा वर्ग नवीन वर्षाची मौजमस्ती फक्त नशा पाणी करून करतात व याचे गंभीर परिणाम त्या व्यक्तीला किंवा त्यांच्या कुटुंबीयांना भोगावे लागतात ही बाब सर्वांनाच ग्यात आहे. त्यामुळे नवीन वर्षाचे स्वागत करतांना वाढत्या दुर्घटना पहाता मद्यपिवुन वाहन चालवु नये, वाहन चालवितांना मोबाईलचा वापर टाळावा, कोणालाही त्रास होणार नाही हे लक्षात घेऊन जल्लोष करावा.३१ डिसेंबरला सरकारने घालून दिलेल्या नियमांचे काटेकोरपणे पालन करून आनंदाने नवीन वर्षाचे स्वागत व्हायला पाहिजे. कारण पोलिस विभाग आपल्याच संरक्षणाकरीता नियम बनवित असतात. अपघात होवू नये, अनुचित प्रकार घडू नये व ३१ डिसेंबर सर्वत्र शांततेत पार पडावा याच उद्देशाने पोलिस विभागाने सर्वसामान्यांच्या बचावासाठी काही अटी घालून दिलेल्या आहे त्याचे पालन व्हायलाच पाहिजे.कारण देशासह राज्यात दुर्घटनांचे प्रमाणात मोठ्या प्रमाणात वाढले आहे.याचे मुख्य कारण म्हणजे नियमांचे उल्लंघन करून वाहन चालविणे. यामुळेच देशासह राज्यात अनेक दुर्घटना रोज होतांना दिसतात.त्याचप्रमाणे राज्यासह देशात हिट ॲंड रन चे प्रमाण सुध्दा मोठ्या प्रमाणात वाढल्याने दररोज दुर्घटना मोठ्या प्रमाणात होतांना दिसते आणि हा संपूर्ण प्रकार नशेमुळे होत असतो. त्यामुळे नवीन वर्षे साजरे करतांना सतर्कता बाळगुन साजरे करावे अन्यथा आ बैल मुझे मारअशी परिस्थिती होवू शकते आणि याचे गंभीर परिणाम भोगावे लागु शकतात.त्यामुळे कोणत्याही प्रकारच्या दुर्घटना होणार नाही याची काळजी घेवूनच २०२५ चे स्वागत केले पाहिजे. जनतेला मी आग्रह करतो की २०२५ आला म्हणून जास्त उत्साहित होवू नका, पदोपदी सावधगिरी बाळगा.प्रत्येक धर्माच्या लोकांनी आपापल्या संस्कृतींचे अनुकरण करून नवीन वर्षाच्या निमित्ताने आगळावेगळे सांस्कृतिक कार्यक्रम अवश्य केले पाहिजे व मंदिर-मज्जीद, गुरूव्दारा,चर्च, बौद्ध विहार इत्यादी अनेक धार्मिक देवस्थानात जाणवु दर्शन घेने अत्यंत गरजेचे आहे यामुळे नवीन ऊर्जा निर्माण होते.कारण इंग्रजी नवीन वर्ष असले तरी आपला धर्म व संस्कृती याला कुठेही खिंडार पडणार नाही व ठेच पोहचणार नाही याची काळजी घेऊन एक उत्साहाचा सण म्हणून सर्वांनीच साजरा करावा.यामुळे जगात नवीन वर्षाच्या निमित्ताने भारतातुन एक चांगला संदेश जाईल.भारताच्या दृष्टीकोनातून वर्षांच्या ३६५ दिवसांचा विचार केला तर आपल्याला कुठे ना कुठे प्रत्येक दिवसाला आगळेवेगळे महत्त्व आहे आणि त्या पध्दतीने आपण साजरे करीत असतोच. त्यामुळे नवीन वर्षाला वेगळे रूप न देता आपापल्या संस्कृतींच्या माध्यमातून साजरे करावे हेच आपल्यासाठी नवीन वर्ष ठरेल.कारण जगाच्या पाठीवर भारत विश्व शांतीचे प्रतीक आहे.त्याचपध्दती आपणही नवीन वर्ष साजरे केले पाहिजे. भारतात प्रत्येक राज्यात, प्रत्येक जिल्ह्यात मोठमोठी नामांकित पर्यटन स्थळे व धार्मिक स्थळे आहेत.याठीकानी जाऊन भजन-कीर्तनाचा आनंद घेवून नवीन वर्षाचे स्वागत केले तर एक आगळावेगळा उपक्रम दिसून येईल व नवीन चेतना जागृत होईल.आपण दुरच्या पर्यटन स्थळांना भेट देवू शकत नसेल तर जवळच्या पर्यटन स्थळांना भेट दिली पाहिजे. त्याचप्रमाणे नवीन वर्षाच्या निमित्ताने भजन, कीर्तन,पुजाअर्चना करून जगात चांगला संदेश जावा या उद्देशाने जनजागृती केली पाहिजे.घटते वनक्षेत्र, वाढते औद्योगिकीकरण,शहरीकरण आणि युद्धजन्य परिस्थिती यामुळे निर्माण होणारे बदलते हवामान यामुळे राज्यासह देशात प्रदुषणाची मात्रा दिवसेंदिवस वाढत असून संपूर्ण सृष्टी धोक्याच्या उंबरठ्यावर आहे.त्यामुळे पृथ्वीच्या रक्षणासाठी वृक्षलागवड होने अत्यंत गरजेचे आहे. याकरीता नववर्षाच्या निमित्ताने भारतासह राज्यातील प्रत्येक व्यक्तीने एक वृक्ष लावुन नवीन वर्षाचे स्वागत केले तर हा एक जागतिक उपक्रम होईल.देशात १४० कोटी लोकसंख्या आहे यातील अर्ध्या लोकसंख्येने म्हणजे ७० कोटी जनतेने नवीन वर्षाच्या निमित्ताने एक जरी झाड लावले तर संपूर्ण भारतात एकाच दिवशी ७० कोटी वृक्ष लागवडीचा विक्रम होईल आणि आपल्याला हीरवागार गालीचा दिसून येईल व एकाचवेळी करोडोंच्या संख्येने वृक्ष लागवड झालेली दिसेल.यामुळे गुरांना चारा व मानवाला शुद्ध हवा मिळण्यास मोठी मदत होईल. यामुळे प्रदूषणावर मात करून पृथ्वीचा समतोल राखण्यास मदत होईल.नवीन वर्षाचे स्वागत सर्वांनीच अवश्य केले पाहिजे परंतु जपून!आपण सर्वांनीच शपथ घेतली पाहिजे की नवीन वर्षात नवीन संकल्प, नवीन उमंग, नवी आशा, नवीन दिशा निर्माण व्हावी याच उद्देशाने पुढचे पाऊल टाकावे. राज्य सरकारने पुढाकार घेऊन ३१ डिसेंबर २०२४ च्या निमित्ताने व २०२५ च्या आगमनाच्या निमित्ताने मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण केले पाहिजे.यातच नवीन वर्षाचे खरे स्वागत दिसून येईल व २०२५ या नवीन वर्षाचा वृक्षलागवडीचा आगळावेगळा उपक्रम सर्वांनीच अंगीकारला तर अनंत काळापर्यंत हा दिवस सर्वांच्याच स्मरणात राहील. नवीन वर्षांच्या हार्दिक शुभेच्छा!जय हिंद !



**रमेश कृष्णराव लांजेवार,**
**माजी विद्यापीठ प्रतिनिधी नागपूर,**
**मो.नं.९९२१६९०७७९.**

## भारताच्या अंतराळ युगाचे शिल्पकार

भारताच्या अंतराळ संशोधनाचे पितामह आणि आधुनिक भारताच्या अंतराळ युगाचे शिल्पकार म्हणून ओळखले जाणारे महान संशोधक विक्रम साराभाई यांची आज पुण्यतिथी आहे. अंतराळात भरारी मारणारा भारत असे आपण म्हणतो. एकवेळ सुई ही बनवू न शकणारा आपला भारत आज विज्ञान तंत्रज्ञान क्षेत्रात स्वयंपूर्ण बनला आहे. अंतराळ विज्ञान क्षेत्रात तर भारताने स्वतः ची वेगळी ओळख निर्माण केली आहे. अंतराळ विज्ञान क्षेत्रात भारत जागतिक महासत्ता बनत आहे याचे सर्व श्रेय विक्रम साराभाई यांनाच जाते. विक्रम साराभाई यांचा जन्म १२ ऑगस्ट १९१९ रोजी झाला. त्यांचे वडील प्रसिद्ध उद्योगपती होते त्यामुळे देशातील मोठ्या नेत्यांचे त्यांच्या घरी उठबस असायची. त्यांच्या वडीलांनाही विक्रम साराभाई यांनी राजकारणात यावे किंवा उद्योगपती बनावे असे वाटत होते पण नियतीच्या मनात वेगळेच होते. विक्रम साराभाई यांना गणित आणि विज्ञान विषयाची खूप आवड होती. १२ वि नंतर उच्च शिक्षण घेण्यासाठी ते विदेशात गेले. केंब्रिज विद्यापीठात त्यांनी विज्ञान शाखेत प्रवेश घेतला. अतिशय तल्लख बुद्धीच्या विक्रम साराभाई यांनी अल्पावधीतच विज्ञान शाखेची पदवी पूर्ण केली. भारतात आल्यावर त्यांनी इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स मध्ये नोबेल पुरस्कार विजेते सर सी व्ही रमण यांच्या मार्गदर्शनाखाली कोस्मिक किरणांवर संशोधन केले. १९४२ साली त्यांनी प्रसिद्ध नृत्यांगना मृणालिनी साराभाई यांच्याशी विवाह केला. त्यांना कार्तिक आज मल्लिका हे दोन अपत्य झाली. १९४५ साली ते ब्रिटनला गेले तिथे त्यांनी इन्वेस्टीगेशन इन ट्रॉपिकल लॅटिट्युडवर संशोधन करून पीएचडी मिळवली. ११ नोव्हेंबर १९४७ ला अहमदाबादला त्यांनी फिजिकल रिसर्च लॅबरोटरीची स्थापना केली. केरळ जवळील थुंबा हे ठिकाण लाँच पॅड साठी निश्चित करण्यात आले कारण हे ठिकाण मॅग्नेटिक इक्वेटर लाईन ( चुंबकीय भूमध्य रेखा ) च्या अगदी जवळ होते पण त्याठिकाणी काही घरे होती तसेच एक चर्चही होते त्यामुळे तेथील लोक तेथून हटण्यास तयार नव्हते भौगोलिक आणि वैज्ञानिक कारणामुळे ही जागा खूप महत्वाची होती पण तेथील लोक ती जागा देण्यास तयार नव्हते शेवटी विक्रम साराभाई यांनी त्या लोकांची भेट घेतली त्या जागेचे महत्व त्यांना समजावून सांगितले. विक्रम साराभाई यांच्यामुळे ती जागा सरकारला देण्यास लोक तयार झाले. भारत सरकारने त्याठिकाणी थुंबा रॉकेट लाँचिंग स्टेशनची स्थापना केली. २१ नोव्हेंबर १९६५ ला तिथून पहिल्या रॉकेटचे प्रेक्षपण करण्यात आले ते यशस्वी झाले. विक्रम साराभाई यांच्यामुळे हे शक्य झाले म्हणून भारत सरकारने या स्टेशनचे विक्रम साराभाई स्पेस सेंटर असे नामांतर केले. विक्रम साराभाई स्पेस सेंटर तर उभारले गेले पण तिथे तज्ज्ञ संशोधकांचा तुटवडा भासू लागला. देशातील तरुण संशोधक विदेशात सेवा बजावत होते. विक्रम साराभाई यांनी त्यांना भारतात परतण्याचे आवाहन केले. त्यांनी या संशोधकांना सांगितले की देशाचे बजेट कमी असल्याने आम्ही तुम्हाला परदेशात आहेत त्याप्रमाणे वातानुकूलित प्रयोगशाळा आणि ऑफिस देऊ शकणार नाही, पण टेबल खुर्ची आणि एक कपाट नक्की देऊ. भारत मातेच्या सेवेसाठी तुम्ही देशात परत या. त्यांच्या आवाहनाला अनेक संशोधकांनी प्रतिसाद दिला. वसंत गोवरीकरांसारखे महान शास्त्रज्ञ त्यांच्या आवाहानाला प्रतिसाद देऊन भारतात परतले. त्यांनी तज्ज्ञ संशोधकांची एक टीम बनवली त्यांच्या नेतृत्वाखालील या टीमने विमानाचे, अंतरिक्ष यानाचे ( रॉकेट ) उड्डाण यशस्वी व्हावे यासाठी जीवाचे रान केले. दिवस रात्र मेहनत केली. त्यांच्या या अविश्रांत मेहनतीचे फळ म्हणजे 'आर्यभट्ट' हा भारताचा पहिला उपग्रह अंतराळात झेपावला. अंतराळ क्षेत्रात भारताने पहिले यशस्वी पाऊल टाकले. डॉ विक्रम साराभाई यांच्या अथक प्रयत्नांमुळेच भारतीय अवकाश संशोधन संस्थेची ( इस्रो) ची स्थापना झाली. आयआयएम अहमदाबादच्या स्थापनेतही त्यांचे मोलाचे योगदान आहे. १९६६ साली डॉ होमी जहांगीर भाभा यांच्या निधनानंतर ते परमाणु ऊर्जा आयोगाचे अध्यक्ष बनले. अनेक आंतरराष्ट्रीय संस्थांची अध्यक्ष पदे त्यांनी भूषवली. अवकाश संशोधनासोबतच टेक्सटाईल, फार्मासिटीकल, अणुऊर्जा, कला या क्षेत्रातही त्यांनी विशेष कामगिरी केली. आज भारत अंतराळ विज्ञान क्षेत्रात स्वयंपूर्ण आहे यामागे विक्रम साराभाई यांचे अथक परिश्रम, दूरदृष्टी आणि खंबीर नेतृत्व ह्यांचा मोलाचा वाटा आहे. डॉ अब्दुल कलाम यांनीही आपल्या अग्निपंख या आत्मचरित्रात विक्रम साराभाई यांच्या नेतृत्व गुणाचे कौतूक केले आहे. डॉ अब्दुल कलाम विक्रम साराभाई यांच्या विषयी म्हणतात, 'ते स्वप्न पहायचे आणि ते प्रत्यक्षात उतरवण्यासाठी मेहनतही घ्यायचे. त्यांचे व्यक्तिमत्व आणि कार्य त्यांच्या सहकाऱ्यांसाठी नेहमीच प्रेरणास्रोत ठरले आहे. त्यांनी त्यांच्या सहकाऱ्यांना वेगळी दृष्टी दिली. विक्रम साराभाई हे भारतीय अंतराळ युगाचे शिल्पकार आहेत.' त्यांच्या कार्याची दखल घेऊन भारत सरकारने त्यांना पद्मभूषण व पद्मविभूषण या मानाच्या पुरस्काराने गौरविले आहे. विज्ञानाचा उपयोग मानवी जीवन सुखी व समृद्ध करण्यासाठी झटणाऱ्या या महान संशोधकाचे ३०डिसेंबर १९७१ साली थुंबा येथेच हृदयविकाराने निधन झाले. विक्रम साराभाई यांना पुण्यतिथीदिनी विनम्र अभिवादन!



**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

# चांदवड येथे मौर्य क्रांती सेवा (महा)संघाचे राज्य अधिवेशन तथा धनगर जागृती परिषद

## उपस्थित राहण्याचे संघाचे जालना जिल्हा अध्यक्ष हनुमंत दवंडे यांचे आवाहन

परतूर । प्रतिनिधी - मौर्य क्रांती सेवा ( महा)संघाच्या वतीने रविवार दि.२९ डिसेंबर २०२४ रोजी लोकमाता पु. अहिल्यामाई होळकर यांच्या त्रिशताब्दी जन्मोत्सवी वर्षानिमीत्त त्यांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या चांदवड. जि. नाशिक या ऐतीहासीक नगरीत तिसरे अधिवेशन संपन्न होत आहे. या अधिवेशनाला मराठवाड्यातील समाज बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थीत राहण्याचे आवाहन मौर्य क्रांती सेवा (महा) संघाचे जालना जिल्हा अध्यक्ष हनुमंत दवंडे यांनी केले आहे..

जालना जिल्हा व मराठवाड्यातील शहर व परिसरातील समाजबांधवाची बैठक नुकतीच संपन्न झाली नियोजनासाठी मौर्य क्रांती महासंघाचे प्रदेशाध्यक्ष राजीव हाके, राज्य कार्यकारीणीचे संदीप दासनोर, मल्हार सेनेचे विनोद आण्णा खेमनर, खेमचंद पाकळे, विजय पाटील यांच्या उपस्थीतीत बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.

दोन सत्रात हे अधिवेशन संपन्न होणार आहे. या अगोदर दोन्ही अधिवेशन हे श्री .क्षेत्र जेजुरी येथे संपन्न झाले. या तिसऱ्या अधिवेशनाचे उद्घाटन सांगली येथील पेरीयार प्रबोधनीचे अध्यक्ष इंजी. शिवाजीराव शेंडगे यांच्या हस्ते होणार आहे. या अधिवेशनात पहिल्या सत्रात सत्यशोधक विचाराचे अनुयायी कै. मारोतरावजी पिसाळ यांच्या स्मरणार्थ दिला जाणारा सत्यशोधक प्रबोधनकार पुरस्कार प्रसीध्द विचारवंत लेखक य ज्यांनी पिसाळ मामा यांच्या सहवासात कार्य केले असे आर .एस. यादव यांना दिला जाणार आहे. विशेष सन्मान म्हणून नुकतेच विविध पुरस्काराने सन्मानीत केले गेलेल्या आदर्श ग्राम ढोरखेडयाच्या सरपंच सौ सुनीताताई चचनराव मिटकरी, ठेलारी समाजाच्या हक्काची लढाई लढणारे समाजनेते विठ्ठलभाऊ मारणर खान्देश विभाग युवा उदयोजक तथा मातोश्री पतसंस्थेचे संस्थापक हनुमंत दुधाळ शेट पश्चीम महाराष्ट्र यांचा सुध्दा सन्मान केल्या जाणार आहे.

या अधिवेशनात वर्षभर घेण्यात आलेल्या विविध स्पर्धा यात वक्तृत्व स्पर्धा, राज्यस्तरीय चित्रकला स्पर्धा, यातील विजेत्यांचा ही बक्षिस सन्मानपत्र देऊन सन्मान केल्या जाणार आहे. उदयोगपती बेंगलोर कर्नाटकाचे आनंदा होनमाने यांचे बडील कै. दाजी बाळू होनमाने यांच्या स्मरणार्थ पारीतोषीक दरवर्षीप्रमाणे याही वर्षी दिल्या जाणार आहेत.

पहिल्या सत्रात महानायक खंडोंबा पुस्तकाचे लेखक संचीत धन्वे, कराड येथून मौर्य क्रांती महासंघाचे राज्यमहासचिव तुकाराम जानकर , जालना येथील लेखक तथा विभागीय प्रभारी डॉ. विनोद वाघाळकर प्रदेश प्रभारी ॲड. उतमभाई कोळेकर आपले विचार मांडणार आहेत. प्रमुख पाहुणे म्हणून बारा बलुतेदार महासंघपाचे अध्यक्ष कल्याणराव दळे, मुंबई महानगर पालिकेचे पूर्वाउपायुक्त लक्ष्मण व्हटकर, धनगर कर्मचारी महासंघाचे प्रदेशाध्यक्ष अंकुश निर्मळ, पालघरचे इंजी संतोष सातपुते, वाघर चित्रपटाचे निर्माते राजेंद्र बरकडे, विविध मान्यवर उपस्थीत राहणार आहेत. या सत्राचे प्रास्तविक प्रदेशाध्यक्ष राजीव हाके हे करणार आहेत तर सूत्रसंचलन प्रकाश कुटे व आभार शैलाताई नवघरे मानणार आहेत. या अधिवेशनाची अध्यक्षता मौर्य क्रांती महासंघाचे संस्थापक अध्यक्ष बलभिम माथेले करणार आहेत. दुसरे सत्र हे सर्वासाठी खुले असणार आहे. या सत्रात आजच्या काळात समाजाच्या सर्वागीन विकासासासाठी समाजाने नेमके काय केले पाहिजे यावर पाच सत्रात दिलेल्या विषयावर भुमीका पदाधीकारी मांडतील सभागृहातील उपस्थित सर्वजन या विषयावर खुली चर्चा करतील प्रश्नोतरे होतील, चर्चेला अंतीम स्वरूप देवून ते ठराव घेतले जातील व पाठवले जातील. या सत्राचे आभार विभागीय अध्यक्ष सुभाष शेंगुळे मानतील.



सकाळी ९ वा स्थानिक पदाधिकारी यांच्या उपस्थितीत होळकर रंगमहाल येथे लोकमाता पु. अहिल्यामाई होळकर यांच्या प्रतिमेचे पूजन होवून, पारंपरिक धनगर वाजंत्रीच्या निनादात होळकर वाडा रंगमहाल येथे ज्योत प्रज्वलीत करून मिरवणूकिला सुरुवात होईल, राजे होळकरांचे सुभेदार श्री मल्हारराव होळकर यांचा इतिहास व चांदवड नगरिचे महत्व सांगतील महाराष्ट्रातील होळकर शाहीचे अभ्यासक लक्ष्मण नजन सर. त्यानंतर सर्व पदाधीकारी यांच्या उपस्थीतीत होळकरवाडा ते रेणूका लॉन्स पायी गजनृत्य व सांस्कृतिक परंपरेनुसार ही ज्योत स्थळापर्यंत आणल्या जावून कार्यक्रमाची सुरुवात होणार आहे. सर्वानी या कार्यक्रमासाठी उपस्थित रहावे, असे आवाहन मौर्य क्रांती सेवा(महा)संघाचे जालना जिल्हा अध्यक्ष तथा दैनिक पत्रकार हनुमंत दवंडे यांनी केले आहे.

## व्यापाऱ्याची पैशाची बॅग अज्ञातांनी पळवली; घटना सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद




**जालना । प्रतिनिधी** - दिनांक २९ रविवार रोजी सकाळी ११ वाजता मिळालेल्या माहितीनुसार जालना शहरातील जुना मोंढा भागात एका व्यापाऱ्याची साडेबारा लाखाची बॅग अज्ञातांनी लंपास केल्याची घटना काल रात्री साडेनऊ वाजेच्या सुमारास घडलीय. दुचाकीवर आलेल्या ४ ते ५ अज्ञात चोरट्यांनी व्यापाऱ्याला चापट बुक्क्यांनी मारहाण केली. त्यानंतर व्यापाऱ्याजवळील साडे बारा लाख रुपये असलेली बॅग हिसकावून घेत पळ काढला. या घटनेचा संपूर्ण थरार सीसीटीव्ही कॅमेऱ्यामध्ये कैद झालाय. शहरातील जुन्या मोंढा भागातील कापड दुकानाच्या गल्लीमध्ये ही घटना घडली आहे. याप्रकरणी सदर बाजार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून या घटनेचा अधिक तपास पोलीस करीत आहेत. दरम्यान जालना शहरात घडलेल्या या चोरीच्या घटनेमुळे एकच खळबळ उडाली आहे.

## लग्नाचे आमिष दाखवून अल्पवयीन मुलीवर वर्षभरापासून अत्याचार

**घनसावंगी** - दिनांक २९ रविवार रोजी दुपारी दोन वाजता मिळालेल्या माहितीनुसार एका खाजगी क्लासच्या संचालकाने वर्षभरापासून एका अल्पवयीन मुलीला लग्नाचे आमिष दाखवून अत्याचार केल्याची धक्कादायक घटना समोर आलीय. जालना जिल्ह्यातील घनसावंगी तालुक्यातील कुंभार पिंपळगाव येथील ही धक्कादायक घटना आहे. आसाराम राऊत असं संशयित आरोपीच नाव असून, याप्रकरणी घनसावंगी पोलीस ठाण्यात बाल लैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आलाय. दरम्यान पोलिसांनी संशयित आरोपी आसाराम राऊत याला घनसावंगी पोलिसांनी ताब्यात घेतल असून अधिक तपास सुरू आहे.


## प्राजक्ता माळी यांनी घेतली फडणवीसांची भेट

**मुंबई** - अभिनेत्री प्राजक्ता माळी हिने रविवार (दि.२९) मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. भाजप आमदार सुरेश धस यांची प्राजक्ताने फडणवीस यांच्याकडे तक्रार केली आहे. दरम्यान, पुढील काळात धस यांच्याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस कोणती भूमिका घेणार याकडे सर्वांचे लक्ष आहे. याबाबत प्राजक्ता माळी हिने देवेंद्र फडणवीस यांच्याकडे निवेदन देखील दिले आहे. अभिनेत्री प्राजक्ता माळी यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची सागर निवासस्थानी भेट घेतल्यानंतर फडणवीस यांनी प्रतिक्रिया दिली आहे. फडणवीस म्हणाले, त्यांच्या सन्मानाला बाधा येईल, असे कुठलेही कृत्य खपवून घेणार नाही आणि त्यावर कारवाई केली जाईल. त्यांच्याविरोधात यूट्यूबवर काही लोक आक्षेपार्ह व्हिडिओ प्रसारित करतात, अशीही तक्रार त्यांनी यावेळी केली. त्या सर्वांवर सुद्धा कारवाई करण्याचे आश्वासन दिले.

# नीच प्रवृत्तीचे भाजप सरकार!

मौनी बाबा म्हणून हिणवले गेलेले माजी पंतप्रधान डॉ.मनमोहन सिंग ह्यांचे निधन झाल्यानंतरच त्यांनी घेतलेले निर्णय किती राष्ट्र हिताचे होते हे आज देशाला समजले.मृत्यू नंतरही त्यांच्यावर टीकाटिप्पणी करणे सुरूच आहे हे नीच मनाचे लक्षण आहे.दिवंगत पंतप्रधान डॉ मनमोहन सिंग ह्यांचे अंत्यसंसकार व स्मारक प्रथेप्रमाणे राजघाटावर करण्याचे सोडून भाजप सरकार निगमबोध घाट येथे करून त्यांची अवहेलना करते अश्या घटना ह्यापूर्वी कधी घडल्या नव्हत्या.विद्यमान सरकार ज्यांनी डॉ.मनमोहन सिंग ह्यांच्या मनरेगा मुद्दा,आधार कार्डचा मुद्दा वास्तूसेवा कर(जीएसटी ) चा मुद्दा ह्याला कडाडून विरोध केला होता.घटनाबाह्य ठरवले होते.आज त्याच विरोधकांना ह्या सर्व योजना राबवण्याची पाळी आली यातच डॉ.मनमोहन सिंग ह्यांची आपल्या तेजाने तळपणारा सूर्य पण इतरांस न जाळणारा सूर्य ह्याची प्रचिती आली.खऱ्या इतिहासाला मर्मदृष्टी असते आणि तो विहंगम अवलोकन करू शकतो पूर्वग्रहाचा चिखल आता तरी दूर व्हायला हरकत नाही.डॉ.मनमोहन सिंग यांनी त्यांच्या गेल्या दहा वर्षात १२५ पत्रकार परिषद घेतल्या तर विद्यमान पंतप्रधान मोदीजी ह्यांनी एकही पत्रकार परिषद घेतली नाही ह्यावरून लोकशाही सचोटीचा निकर्ष कसा असावा ह्याचे मूर्तिमंत उदाहरण म्हणजे डॉ. मनमोहन सिंग.व्हेन मनमोहन सिंग स्पीक्स,पीपल लिसन हे अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष बराक ओबामा ह्यांचे वक्तव्य मनमोहनसिंग किती मोठ्या विद्वान उंचीचे होते हेच दर्शवते.निवडून येणाऱ्या नेत्यांपेक्षा मनमोहन सिंग सर्वार्थाने लोकशाहीवादी होते कारण लोकशाही हि मुंबईतील लोकलसारखी अनेकांना सामावून घेणारी असावी लागते हे तत्व डॉ.मनमोहन सिंग ह्यांनी आपल्या कारकिर्दीत कोणताही बडेजाव न करता अमलात आणले.संकट काळात देशाला आर्थिक संकटातून बाहेर काढण्याचे कसब त्यांनी दाखवले तोच कित्ता विद्यमान सरकारने रुपयाचे अवमूल्यन पाहता रघुराम राजन ह्यांना सरकारमध्ये सामील करून अथवा अर्थतज्ज्ञ सल्लागार नेमणूक करावी.



**यशवंत चव्हाण, सीबीडी बेलापूर (नवी मुंबई)**
**मो.न.९९२०७७६२७७.**

# जालन्यातील इज्तेमाची तयारी अंतिम टप्प्यात

## जिल्ह्याभरातील लाखो मुस्लिम बांधवांची राहणार उपस्थिती



**जालना । प्रतिनिधी -** शहरातील राजूर रोडवर फेरोज लाला तांबोली यांच्या पेट्रोल पंपला लागून ६२ एकर जमिनीवर जानेवारीमध्ये होणाऱ्या दोन दिवसीय जिल्हास्तरीय दिनी इज्तेमास्थळी मंडप टाकण्याच्या कामासह इतर ८० टक्के कामे पूर्ण झाली आहेत. वाहन पार्किंगसह उर्वरित २० टक्के कामे येत्या ४ दिवसांत पूर्ण होणार असल्याचा दावा येथील जिम्मेदार आयोजकांनी व्यक्त केला आहे.

तब्बल दोन लाख पेक्षा जास्त स्क्वे.फुट परिसरात मुख्य मंडप लावण्यात आले असून मंडपचे काम अंतिम टप्प्यात पुर्ण होत आले आहे.

वजूसाठी पाण्याची व्यवस्था करण्यात आली आहे त्यासाठी वेगवेगळ्या विहिरीतून पाणी घेण्यात येणार असून टँकरने पाणी पुरवठा करण्यात येणार आहे.

संपुर्ण परिसरामध्ये लाईटची व्यवस्था करण्यात आली असून मोठमोठ्या टावरसह ठिकठिकाणी लाईटचे फोकस लावण्यात आले आहे. चार दिवसांवर येऊन ठेपलेल्या इज्तेमास्थळी आता दररोज जिल्हाभरातून हजारो खिदमतगार भाविक कामकाज करण्यासाठी येथे दाखल होत आहेत. काही खिदमतगार दिवसा तर काही रात्री आपला वेळ देऊन याठिकाणी काम करत आहेत.वेगवेगळ्या क्षेत्रातील युवक,तरूण,लहान मोठे सर्वच जण जसा वेळ भेटेल तसे ईज्तेमास्थळी भेट देऊन आपआपली कामे करत आहेत.

शुक्रवार आणि शनिवार अशा ३, ४ जानेवारी दरम्यान होणाऱ्या दोन दिवसीय जिल्हास्तरीय इज्तेमात महाराष्ट्रभरातील अनेक प्रमुख मान्यवर मौलानांच्या उपस्थितीमध्ये लाखो भाविकांना मार्गदर्शन होणार आहे. शनिवारी ४ जानेवारीला सायंकाळी मगरिब नमाज पठणनंतर पुणे येथील हाफिज मंजूर मौलाना यांच्या दुवाने इज्तेमाची सांगता होणार आहे.

या दोन दिवसीय इज्तेमास्थळी येणाऱ्या मुस्लिम बांधवांसाठी नाममात्र अल्पदरातील जेवणाचे झोन लावण्यात येणार आहेत. तसेच इज्तेमास्थळी ठिकठिकाणी स्टॉलवर सबील लावण्यात येणार असून याठिकाणी पिण्याचे पाणी आणि नाष्टा सर्वांसाठी मोफत उपलब्ध राहणार आहे.

लाखो भाविकांसाठी शौचालयाची स्वतंत्र व्यवस्था करण्यात आली असून कृत्रीम शौचालय तसेच आंघोळी साठी कृत्रीम बाथरूम ऊभारण्यात आले आहे.

जालना शहरासह जालना तालूका, भोकरदन, जाफराबाद, मंठा, परतूर, घनसावंगी, अंबड आणि बदनापूर या आठ तालूक्यातून मुस्लीम बांधव या ईज्तेमासाठी येणार असून लाखो मुस्लीम भाविक येणार असल्याचे जिम्मेदार आयोजकांच्या वतीने सांगण्यात येत आहे.

ईज्तेमासाठी येणाऱ्यांना आरोग्याच्या दृष्टीने काही त्रास जाणवला तर त्यासाठी दवाखाना आणि मोफत औषधी सुध्दा उपलब्ध राहणार असून तज्ञ डॉक्टर मंडळी पुर्ण दोन दिवस सेवा देणार आहेत.

दरम्यान जिल्ह्याभरातून ईज्तेमासाठी येणाऱ्या भाविकांच्या वाहनासाठी वेगवेगळ्या ठिकाणी स्वतंत्र पार्कींग ची व्यवस्था करण्यात आली असून जालना - राजूर रोडवर नियमित दैनंदिन वाहनांना अडथळा होऊ नये म्हणून शेकडो स्वयंसेवक रहदारी सुरळीत ठेवण्यासाठी परिश्रम घेणार आहेत.

## जि प शाळा डावरगावं येथे विद्यार्थी यांनी भरविला आनंद मेळा

# कोणी केला फायदा तर कोणाला तोटा

**दत्ता देशमुख**



**टेंभुर्णी -** जिल्हा परिषद शाळा डावरगाव येथे शैक्षणिक आठवडी बाजाराचे आयोजन करण्यात आले होते या आयोजना मध्ये ४८ विद्यार्थ्यांनी आप आपली वेगवेगळ्या प्रकारचे दुकाने थाटली होती सर्व प्रकारचा भाजीपाला कटलरी दुकान पाववडा आपे कचोरी समोसा इडली खमंग ढोकळ्याचे दुकान यासह विविध धान्याचे दुकाने दुध व दह्याचे दुकान पपई पेरू बोरे काशि फळ भोपळा चक्री यासारख्या फळांचे दुकान थाटले होते एकूण २४ हजारांचा व्यवहार करण्यात आला असून साडेतीन हजार रुपये नफा मिळवण्यात विद्यार्थी यशस्वी झाले आहेत तर काही विद्यार्थ्यांना तोट्याचा सामना करावा लागला या बाजाराच्या यशस्वीते साठी मुख्याध्यापक श्री अहिरे श्री टी बी जाधव श्री गोविंद जाधव श्री सुनिल पवार श्री आढाव श्रीमती देशमुख मॅडम श्रीमती साने मॅडम यांच्यासह शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष उपाध्यक्ष व सर्व सदस्य यांनी परिश्रम घेतले या कार्यक्रमासाठी राज्य आदर्श शिक्षक श्री जमीर शेख सर माजी शिक्षण विस्ताराधिकारी श्री एस डी नवले सर माजी केंद्रप्रमुख श्री नवले सर माजी मुख्याध्यापक श्री डी ए देठे सर श्री इंगळे सर श्री तायडे सर श्री दंदाले सर श्री नवले सर यांच्यासह अनेक नागरिकांनी उपस्थित राहून मनसोक्त खरेदीचा आनंद लुटला या बाजाराच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना हिशोब सांभाळण्याचे पैशाचे व्यवहार नफा तोटा तसेच गणितीय दृष्टिकोन सोबतच व्यवहारिक दृष्टिकोन विकसित होण्यास मदत झाली.

# बसमधील अपघातग्रस्तांची आ. दानवे यांनी घेतली भेट

टेंभुर्णी । प्रतिनिधी - चिखली येथील खाजगी रुग्णालयात कोळेगाव बस अपघातातील जखमींची भेट घेऊन प्रकृतीबाबत आस्थेवाईकपणे चौकशी करताना आ. संतोष पा. दानवे यांच्यासह इतर पदाधिकारी, जाफ्राबाद ते चिखली या मुख्य रस्त्यावरील कोळेगाव (ता. जाफ्राबाद) घाटातील बस अपघातात जखमी झालेल्या प्रवाशांची आ. संतोष पा. दानवे यांनी शनिवारी (दि.२८) चिखली येथील एका खाजगी रुग्णालयात जाऊन भेट घेतली. यावेळी आ. दानवे यांनी जखमी प्रवाशांशी चर्चा करून त्यांच्या प्रकृतीची आस्थेवाईकपणे चौकशी केली.

जाफ्राबाद येथून चिखलीकडे जाणारी चिखली आगाराची बस कोळेगांव गावाजवळील घाट चढत असतांना वीस फुट खड्ड्यामध्ये कोसळून दि. २४ रोजी अपघात झाला होता. या अपघातात १५ प्रवासी जखमी झाले होते. पैकी तीन प्रवाशांची प्रकृती गंभीर होती. त्यांच्यावर चिखली येथील खाजगी रुग्णालयात उपचार सुरू होते. दरम्यान, आज आ. संतोष पा. दानवे यांनी चिखली येथे खाजगी रुग्णालयात उपचार घेत असलेल्या अपघातग्रस्तांची भेट घेऊन प्रकृतीची चौकशी केली. डॉक्टरांशीही संवाद साधला. यावेळी रामेश्वर साखर कारखान्यचे चेअरमन विजयनाना परिहार, भाजपा तालुकाध्यक्ष नाना भागिले, कडुबा शितोळे यांच्यासह रुग्णांच्या नातेवाइकांची उपस्थिती होती.

# जिजाऊंच्या लेकींचा लोकजागर; विधवा विदुर घटस्फोटीत अपंग यांच्यासाठी मेळाव्यात स्वतंत्र सत्र

**बुलढाणा । प्रतिनिधी -** महाराष्ट्र मराठा महिला सोयरीक संघाची बैठक माऊली बिल्डिंग ,चिखली रोड या ठिकाणी पार पडली. या बैठकीचे आयोजन नियोजन पूर्णतःजिजाऊंच्याच्या लेकिणीच केले होते. पाच जानेवारी रोजी बुलढाणा येथे महाराष्ट्र मराठा सोयीचा वधुवर परिचय मेळावा आयोजित करण्यात आला आहे. या मेळाव्याची सर्व सूत्रे महिलांच्या हाती राहणार असल्याचे सोयरीक महासंघाच्या जिल्हाध्यक्ष पत्रकार सुरेखा ताई सावळे यांनी यावेळी सांगितले.याबाबतच्या समित्या व नियोजनही बैठकीत पार पडले.

रविवार दिनांक ५ जानेवारी २०२५ ला महाराष्ट्र मराठा सोयरीक च्या वतीने नियोजित बुलढाणा येथील भव्य वधु वर परिचय मेळाव्याच्या आयोजन व नियोजनार्थ बुलढाणा शहरातील महिला भगिनींची बैठक मराठा सोयरीक संघाच्या जिल्हाध्यक्षा पत्रकार सुरेखा सोमनाथ सावळे यांच्या अध्यक्षतेखाली चिखली रोड येथील मिसाळ यांच्या माऊली हाईट निवासस्थानी झाली. बैठकीमध्ये बहुसंख्येने बुलढाणा शहरातील महिला भगिनी उपस्थित होत्या. बैठकीमध्ये मेळाव्याच्या आयोजन व नियोजनार्थ साधक बाधक चर्चा होऊन संपूर्ण कार्यक्रम हा जिजाऊंच्या लेकिंच्या नेतृत्वात होणार असे ठरले. व्यासपीठावर संपूर्णतः जिजाऊंच्या लेकीच असणार आणि सूत्रसंचालन ही महिला भगिनीच करणार सत्कार ही त्यांचेच होणार अशाच पद्धतीने आतापर्यंतचे मेळावे संपन्न झालेले आहेत. त्याच धर्तीवर हा मेळावा देखील होत आहे.मेळाव्यामध्ये उच्चशिक्षित मुले मुली याचबरोबर शेतकरी कुटुंबातील मुले मुली यांच्या सोबतच विधवा विदुर घटस्फोटीत अपंग यांच्यासाठी स्वतंत्र सत्र घेण्याचे ठरले. यापूर्वी बुलढाणा शहराच्या इतिहासातील पहिला विधवा विदुर घटस्फोटीत अपंग मेळावा १६ एप्रिल २०१७ मध्ये गर्दे वाचनालय येथे महाराष्ट्र मराठा सोयरिक च्या वतीने आयोजित केल्याची आठवण बैठकीत करून देण्यात आली . स्व डॉ रामदास भोंडे या मेळाव्यात सक्रिय होते. त्यांचीही आठवण या निमित्ताने काढण्यात आली.बैठकीमध्ये बुलढाणा शहरामध्ये घरोघर जाऊन मेळाव्याच्या प्रचार व प्रसार करण्यासंबंधी नियोजन करण्यात आले. जिजाऊंच्या लेकींना एक व्यासपीठ महाराष्ट्र मराठा सोयरिक ने उपलब्ध करून दिलेले आहे. शहरातील डॉक्टर ,इंजिनीयर ,वकील, पत्रकार, शिक्षक, ग्रामसेवक, पटवारी, व प्रशासनातील इतर समाज बांधव यांची स्वतंत्र बैठक घेणार असे ऍड विजय सावळे यांनी सांगितले. बैठकीला प्रामुख्याने सौ मीनल ताई आंबेकर, डॉ सौ संजीवनी शेळके, सौ मालतीताई शेळके, प्रा सौ नवनीता चव्हाण, प्रा अंजली सावळे, डॉ सौ लता बाहेकर, चारुशीला पाटील, डॉ् विजया काकडे ,सौ संगीता लाटे, सौ आशा राजे जाधव सौ मंगला पाटील, सौ प्रतिभा भोंडे, सौ मालतीताई सवडतकर, सौ किरण भोंडे, सौ गीता उगले, सौ सुशीला पवार, सौ कविता कळवाघे, सौ वैशाली मस्के, सौ पुष्पा जवंजाळ, सौ तनुजा आडवे बहुसंख्य महिला भगिनींची उपस्थिती होती.

प्रा अण्णासाहेब म्हल्सने, भगवानराव कानडजे नारायणराव मिसाळ, डॉ शेषराव काळवाघे, प्रा बालाजी शिंगणे श्री मंगेश मोगल यांनी मार्गदर्शन केले. व येत्या २९ तारखेला चिखली येथे अशोकराव चौधरी यांच्या निवासस्थानी होणाऱ्या बैठकीत उपस्थित राहण्याचे सगळ्यांना आवाहन केले



# शाळांमध्ये 'घर घर संविधान' उपक्रमांतर्गत लेखी परीक्षेचे आयोजन



**बोरघर । माणगाव । प्रतिनिधी -** संविधानाच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त शासकीय आदेशानुसार 'घर घर संविधान' हा उपक्रम श्रीमती सुरेखा तांबट मॅडम, गटशिक्षणाधिकारी माणगाव यांच्या संकल्पनेतून नाविन्यपूर्ण पद्धतीने माणगाव तालुक्यातील सर्व व्यवस्थापनाच्या सर्व शाळांमध्ये राबविण्यात येत आहे. याच उपक्रमाचा एक भाग म्हणून आज 'ए. के. आय. उर्दू हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज, गोरेगाव' आणि 'ना. म. जोशी विद्याभवन, गोरेगाव' येथे संविधान गुण गौरव समितीच्या सहकार्याने लेखी स्वरूपात एक 'संविधान गुण गौरव' स्पर्धा परीक्षेचे आयोजन करण्यात आले. 'घर घर संविधान' ह्या शासन निर्णयाची आदर्श अंमल बजावणी माणगाव तालुक्यात आद. श्रीमती सुरेखा तांबट मॅडम, गटशिक्षणाधिकारी, माणगाव यांच्या नेतृत्वाखाली व त्यांनी केलेल्या नियोजनानुसार होत आहे. या संविधानावर आधारित लेखी स्पर्धा परीक्षेत ए. के. आय. उर्दू माध्यमिक विद्यालय व ज्युनिअर कॉलेजच्या तब्बल ५०० विद्यार्थ्यांनी, तर ना. म. जोशी विद्याभवन गोरेगाव येथील २०० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवत एक आगळावेगळा आदर्श निर्माण केला. अशा प्रकारच्या विविध उपक्रमांच्या माध्यमातून माणगाव तालुक्यात होणारी 'घर घर संविधान' ह्या शासन निर्णयाची आदर्शवत अंमलबजावणी राज्यभरात कौतुकाचा विषय ठरत आहे. तो अधिकाधिक लोकप्रिय होऊन अनुकरणीय ठरावा, यासाठी माणगाव तालुक्यातील सर्व शिक्षक, केंद्र प्रमुख व अधिकारी वर्ग मनापासून प्रयत्न करत असल्याचे आद. श्रीमती सुरेखा तांबट मॅडम, गटशिक्षणाधिकारी यांनी याप्रसंगी नमूद केले.

ए. के. आय. उर्दू शाळेतील तब्बल सहभागी झालेली ५०० विद्यार्थ्यांची संख्या ही केवळ माणगावसाठीच नव्हे, तर संपूर्ण महाराष्ट्रासाठी प्रेरणादायी असून मला आपल्या विद्यालयातील सर्व विद्यार्थी व शिक्षकांचा खुप अभिमान वाटत असल्याचे यावेळी गटशिक्षणाधिकारी मॅडमांनी गौरवोद्गार काढले. हेच ५०० विद्यार्थी 'संविधान दूत' बनून घरोघरी संविधान पोहोचवतील, असा विश्वास यावेळी मॅडमांनी व्यक्त केला. गटशिक्षणाधिकारी मॅडमांनी व्यक्त केलेल्या विश्वासाला सार्थ ठरवण्याचा निश्चित प्रयत्न करणार असल्याचे यावेळी ए. के. आय. हायस्कूलचे प्राचार्य आद. मूनीर सरांनी आश्वासित केले. 'घर घर संविधान' ह्या उपक्रमाची आदर्शवत अंमलबजावणी सदर उर्दू हायस्कूल मध्ये होत असल्याचे समाधान शिक्षण विस्तार अधिकारी आद. खामकर सरांनी आपल्या मनोगतातून व्यक्त केले. संविधान हे केवळ एक कायद्याची जंत्री नसून प्रत्येक भारतीय नागरिकांच्या सन्मानजनक तथा प्रतिष्ठपूर्वक जीवन जगण्याचा आधार असल्याचे सांगत संविधान अभ्यासक नुरखाँ पठाण यांनी आपल्या मनोगतातून संविधानाचे महत्व विषद केले.

याप्रसंगी श्रीमती सुरेखा तांबट मॅडम गटशिक्षणाधिकारी माणगाव, शिक्षण विस्तार अधिकारी खामकर सर, मुख्या. मूनीर सर, अनिस अब्बासी सर, संविधान प्रचारक नुरखाँ पठाण, नदीम भाई, इस्माईल परदेशी, मोहसिन सर, सलीम सर, ए. के. आय. उर्दू हायस्कूलचे सर्व शिक्षकवृंद व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. तर दुपार सत्रात ना. म. जोशी विद्याभवन, गोरेगाव येथे झालेल्या संविधान गुण गौरव परीक्षे दरम्यान मुख्या. आद. शहा सर, पर्यवेक्षक आद. खैरे मॅडम, खामकर मॅडम, सुरेश कांबळे सर, सचिन गोरेगावकर सर, तसेच अनेक शिक्षक बंधू भगिनी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जिल्हा परिषद लिपिक वर्गीय कर्मचारी संघटनेच्या मराठवाडा कार्याध्यक्षपदी संजय जगताप

**जालना । प्रतिनिधी -** महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद कर्मचारी संघटना ६१५ च्या वार्षिक सर्वसाधारण सभेत कार्यकारिणीची निवड करण्यात आली. या सभेचे आयोजन ग्रामसेवक प्रशिक्षण केंद्र, जालना येथे दिनांक २८ डिसेंबर २०२४ रोजी सकाळी ११:00 ते दुपारी ४:३0 या वेळेत करण्यात आले. या बैठकीस महाराष्ट्रातील सर्व जिल्हाध्यक्ष आणि सचिव उपस्थित होते.


बैठकीत जिल्हा परिषद जालना मधील कार्यअध्यक्ष मराठवाडा विभाग पदी श्री. संजय रामराव जगताप (कनिष्ठ प्रशासन अधिकारी) यांची निवड करण्यात आली. यावेळी राजाचे राज्याध्यक्ष श्री. मारुति अंकुश जाधव, श्री अरुण जोर्वेकर, सचिव .श्री. उमाकांत सूर्यवंशी ,कोषाअध्यक्ष. श्री. एस. एस. राऊत, कार्याध्यक्ष. श्री. सचिन मगर, कार्याध्यक्ष .श्री. संजय धोटे.श्री. पंकज गुल्हाने,कार्याध्यक्ष. श्री. संजय चव्हाण उपाध्यक्ष.श्री. सागर बाबर राज्य समन्वयक उपस्थित होते.

सभेत जिल्हा परिषद जालना मधील सहाय्यक प्रशासन अधिकारी, कनिष्ठ प्रशासन अधिकारी, वरिष्ठ सहाय्यक, कनिष्ठ सहाय्यक, तसेच तालुकास्तरावरील सर्व कनिष्ठ प्रशासन अधिकारी, सहाय्यक प्रशासन अधिकारी आणि लिपिक वर्गीय कर्मचारी उपस्थित होते.



यावेळी पंचायत समिती भोकरदनचे अरविंद जाधव, श्री. पडोळ, श्री. संजय घुबे, श्री. अनिल, श्री. शैलेश वारकड, श्री. राजेंद्र हेकाडे, श्री. कैलाश बकाल , श्री तांगडे, श्री. कैलाश गिरनारे, श्री. कल्याण बोराडे, श्री. सुभाष चित्रे, श्री. चेके पाटील, श्री. गणेश लोखंडे, श्री. कृष्णा पुंगळे, श्री. पगारे आणि इतर कर्मचारी उपस्थित होते. सभेत विविध विषयांवर चर्चा होऊन कार्यकारिणीची निवड करण्यात आली.

## परतूर पत्रकार संघाच्या अध्यक्षपदी शामसुंदर चित्तोडा, सचिवपदी प्रभाकर प्रधान



**परतूर । प्रतिनिधी -** महाराष्ट्र राज्य अखिल भारतीय परतूर पत्रकार संघाची तालुका कार्यकारिणी जाहीर करण्यात आली यामध्ये अध्यक्ष म्हणून शामसुंदर चित्तोडा यांची बिनविरोध निवड करण्यात आली तर सचिव पदी प्रभाकर प्रधान तर उपाध्यक्ष म्हणून गणेश लालझरे यांची सर्वानुमते बिनविरोध निवड करण्यात आली.

दरम्यान, रविवारी दि.२९, शहरातील शासकीय विश्राम गृहात ज्येष्ठ पत्रकार शिवकुमार भारुका यांच्या अध्यक्षतेखाली नवीन कार्यकारिणी निवडी बाबत बैठक आयोजित करण्यात आली आहे. यावेळी ही निवड करण्यात आली तर उर्वरित कार्यकारणी कोषाध्यक्ष पांडुरंग शेजुळ,सह कोषाध्यक्ष इम्रान कुरेशी सह सचिव कैलाश चव्हाण यांची प्रमुखनिवड करण्यात आली. तर कायदेविषयक सल्लागार ऍड. सुरेश काळे सल्लागार पदी शिवकुमार भारुका, शेषराव वायाळ, सुनील शिवणगिरी, रशीद बागवान, योगेश बरीदे, सय्यद वाजेद, सुरेश कवडे, संजय देशमाने, शेख अथर, हनुमंत दवडे, सुधाकर जाधव, कैलास सोळंके, प्रा.गणेश शिंदे, संतोष आखाडे याची निवड करण्यात आली. यावेळी, संतोष शर्मा, कुलदीप बिनगे, सागर काजळे, शेख असेफ,रवी भद्रगे, पवन राशनकर, राहुल मुजमुले, आदींची यावेळी उपस्थिती होती.

दरम्यान,यावेळी नवनिमर्ाण कार्यकारिणीचा सत्कार करण्यात आला.



**इंडिया महाविकास आघडीतर्फे तर्फे माजी प्रधानमंत्री डॉ मनमोहनसिंग यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहण्यात आली यावेळी खा कल्याण काळे,माजी मंत्री राजेश टोपे,माजी आ कैलास गोरंट्याल,आ राजेश राठोड,काँग्रेस जिल्हा अध्यक्ष राजाभाऊ देशमुख,उबाठा शिवसेना पक्षप्रमुख भास्कर अंबेकर, निसार देशमुख, बबलू चौधरी, अब्दुल रफिक, नंदू जांगडे, आरिफ खान, रमेश गौरक्षक, बाला परदेसी, फेरोज बागवान आदी. (छाया/जावेद तंबोली)**

### जालना महानगरातील मंडळांची कार्यशाळा संपन्न

## पक्षसंघटना वाढविण्यासाठी पक्षाने दिलेले कर्तव्य प्रामाणिकपणे पार पाडा - भास्कर दानवे

**जालना । प्रतिनिधी -**भारतीय जनता पार्टी जिल्हा कार्यालय जालना येथे माजी केंद्रीय राज्यमंत्री श्री.रावसाहेब पाटील दानवे यांच्या मार्गदर्शनाखाली व जालना विधानसभा प्रमुख भास्कर आबा दानवे, महानगर जिल्हाध्यक्ष सतीष जाधव यांच्या प्रमुख उपस्थितीत भाजपा जालना महानगरातील मंडळांची सदस्यता नोंदणी अभियान कार्यशाळा आयोजीत करण्यात आली.

यावेळी भास्कर आबा दानवे यांनी आयोजित केलेल्या भाजपा सदस्यता नोंदणी अभियान कार्यशाळेमध्ये उपस्थित राहून जालना महानगरातून आलेल्या भाजप पदाधिकारी व कार्यकर्त्यांशी मार्गदर्शनात्मक संवाद साधला, भारतीय जनता पक्ष हा कार्यकर्त्यांचा पक्ष असून प्रत्येक कार्यकर्ता आणि पदाधिकारी हा पक्षाचा आधारस्तंभ आहे. भाजपची संघटना अधिक बळकट व्हावी आणि आगामी निवडणुकांमध्ये पक्षाचे वर्चस्व वाढावे, यासाठी सदस्य नोंदणी अभियान महत्त्वपूर्ण आहे. आगामी महापालिकेच्या निवडणुकीमध्ये यश मिळवण्यासाठी प्रत्येक घराघरात पोहोचण्याचे काम या सदस्यता अभियानाद्वारे करावे लागेल. भाजपा पक्ष हा एक विशाल कुटुंब आहे. अधिक सदस्य नोंदणी केल्याने पक्षाची ताकद वाढते आणि आपण अधिक लोकांपर्यंत पोहोचू शकतो. सदस्यता नोंदणी फक्त संख्येची बाब नाही, तर ती प्रत्येक कार्यकर्त्याला पक्षाची निती, तत्त्वे आणि ध्येय समजून त्यामध्ये सक्रियपणे सहभागी होण्याची संधी देते. सदस्य नोंदणी अभियानाला पक्षातील वरिष्ठ नेत्यांनी अतिशय गांभीर्याने घेतले असून विधानसभेच्या अधिवेशनाचा समारोप झाल्यानंतर ताबडतोब सदस्यता नोंदणी कार्यशाळेला मार्गदर्शन करण्यासाठी मुख्यमंत्री श्री.देवेंद्रजी फडणवीस साहेब तसेच प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावणकुळे हे हजर झाले असे श्री.दानवे यांनी सांगत सदस्यता




नोंदणी अभियान कार्यशाळेची रूपरेषा स्पष्ट केली व जालना महानगर मध्ये जास्तीत जास्त सदस्य नोंदणी करावी असे आवाहन पदाधिकारी व कार्यकर्त्यांना केले.

यावेळी महानगर जिल्हाध्यक्ष सतीष जाधव म्हणाले की, कोणीही भारतीय जनता पार्टीचा सदस्य होऊ शकतो यासाठी ८८ 0000 २०२४ या क्रमांकावर मिसकॉल करणे आवश्यक असून याद्वारे आलेल्या लिंक मध्ये नवीन सदस्याची माहिती भरावयाची आहे. अभियान जालना महानगरातील दहा मंडलामध्ये मोठ्या प्रमाणावर राबवण्याचे आवाहन कार्यकर्त्यांना केले. जालना महानगरात प्रत्येक बुथवर जास्तीत जास्त सदस्यता नोंदणी कशी करता येईल, यासाठी सर्वांनी रचनात्मक नियोजन करावे व प्रत्येक बूथवर २०० सदस्य नोंदणीचे उद्दिष्ट निश्चित ठेवावे, आपण आपल्या मंडळातील जास्तीत जास्त सदस्य नोंदणी करून घेण्यासाठी प्रयत्न करावेत असे त्यांनी सांगितले.

यावेळी सोपान पेंढाकर, सिद्धिविनायक मुळे, सुनील भैया खरे, अमोल कारंजेकर, सुनील पवार यांच्यासह भाजपा महानगर मंडळ अध्यक्ष, नगरसेवक, मंडळ प्रभारी, पदाधिकारी, कार्यकर्ते, मोर्चाचे अध्यक्ष, प्रकोष्ठ संयोजक यांच्यासह आदींची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## ब्रेथ एनालायझरच्या सहाय्याने करताय वाहनचालकांची तपासणी

### शहर पोलीस आणि आरटीओचे अधिकाऱ्यांनी कारवाई करून १ लाख ७७ हजार रुपयांचा दंड वसूल

**जालना । प्रतिनिधी -** जालन्यात मद्यपान करून वाहनं चालवणाऱ्यांवर शहर पोलीस आणि उपप्रादेशिक परिवहन विभागाने दंडात्मक कारवाई केलीय. काल सहा वाजल्यापासून रात्री बारा वाजेपर्यंत शहरातील गांधीचमन,अंबड रोड,मंठा रोड,औरंगाबाद चौफुली,बस स्टँड परिसर ई. भागात आरटीओ चे अधिकारी शहरात नाकेबंदी करून ब्रेथ एनालायझरच्या सहाय्याने वाहनचालकांची तपासणी करताय. आज दि. २९रविवार रोजी सकाळी दहा वा. च्या सुमारास मिळालेल्या माहिती नुसार या कारवाईत उपप्रादेशिक परिवहन कार्यालयने ६०० हून अधिक वाहनचालकांची तपासणी केली असून त्यापैकी १० वाहनचालक दारूच्या नशेत वाहन चालवताना आढळून आले आहेत. या प्रकरणी १० वाहन चालकांविरोधात मोटर वाहन कायद्याप्रमाणे कारवाई करून १ लाख ७७ हजार रुपयांचा दंड आकारण्यात आला आहे.

युवा आदर्श

### मूकांदोलन ...

मोर्चा चाले महा मूक
लावून काळ्या फिती
भल्या थंड काळजात
जमाव जमवते भिती
कारण फसरे क्षणार्धा
निषेध फलक हाती
चालू लागे कैक साथी
रे हात मिसळून हाती
विचार हवेत जुळाया
कशाला हवीत नाती
स्वागत करी क्रियेचे
लोक लावती कनाती
निशब्द जथा चालला
बंद करायला बोलती
चावी ही अति अद्भुत
तटस्थ दारा खोलती
स्थितीज उर्जा भरली
मौनात दणकट शक्ती
धरण भरले भावनेनी
सळसळ जाणवे रक्ती
आंदोलनां योग्य दिशा
आता महत्वाचीव्यक्ती
पडसाद बहिऱ्या कानी
समस्येला मिळे मुक्ती
जपायां हवे आंदोलना
शिरकाव करी विकृती
विस्फोट होई मौनाचा
बिघडून टाके आकृती

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.




हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.